## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३९१/२०२३/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. प्रदिप पोपटराव मोरे,<br>रा. मु. पो. खडकी, ता. मालेगाव,<br>जि. नाशिक. | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>मालेगांव कॅम्प यांचे कार्यालय, मालेगाव,<br>ता. मालेगाव, जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक ०९/०६/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक २५/०५/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०९/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असून तत्कालीन जन माहिती अधिकारी हे ऑनलाईन उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २५/०५/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, " दि. १९/०४/२०२३ च्या माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही खोटी व अपुर्ण असून जाणूनबुजून त्यांची दिशाभुल केलेली आहे. माहिती अधिकार कायद्याचा भंग केलेला आहे. तरी त्यांच्या सेवा पुस्तकात माहिती अधिकार कायद्याचा भंग केला अशी नोंद व्हावी व दंडात्मक कारवाई करण्यात यावी व तक्रारदार यांची मानसिक अवहेलना केली त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर ५०,०००/- रुपये शास्ती लादण्यात यावी."

३) तक्रारदार यांनी दि. १९/०४/२०२३ च्या माहिती अर्जान्वये, कॅम्प पोलीस स्टेशन येथील ठाणे आमंलदार यांच्या दालन व त्यांच्या आजूबाजू चे CCTV फुटेज व दि. १९/०४/२०२३ वेळ २.०० ते ४.००(दोन वाजे पासून ते चार वाजेपर्यंत) व दि. १९/०४/२०२३ ठाणे आमंलदार यांची दैनंदिनी याबाबतीत माहिती अधिकार लोगोसह, माहिती मागितलेली आहे.

४) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, तक्रारदार यांच्या दि. १९/०४/२०२३ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, दि. १६/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये, "तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती ही उपविभागांतर्गत येणारे कॅम्प पोलीस ठाणे कडील सहा. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कॅम्प यांचेकडील जा.क्र.११६४/२०२३ दि. १३/०५/२०२३, (आ.क्र.२२४४/२३ दि. १६/०५/२०२३) अन्वये माहिती मागवून पुरविली आहे." तक्रारदार सुनावणीस अनुपस्थित असल्याने, कोणती माहिती खोटी, अपुर्ण व दिशाभुल करणारी दिली आहे. याचा बोध होऊ शकला नाही. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ३९१/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

जावक क्र 6090 17 OCT 2025